**N.C.R.B** (एन.सी.आर.बी)

**I.I.F.-I** (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): गडचिरोली **P.S.**(ठाणे): अरमोरी **Year** (वर्ष): 2019

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0037 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 12/02/2019 22:16 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 (a) |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): मंगलवार

**Time Period** (कालावधी):

**Date From** (दिनांक पासून): 12/02/2019

**Date To** ( दिनांक पर्यंत): 12/02/2019

**Time From** (वेळेपासून): 12:03 बजे

**Time To** (वेळेपर्यंत): 16:10 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 12/02/2019 **Time** (वेळ): 21:00 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ

**Entry No.** (नोंद 033 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 12/02/2019 22:16 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्तळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): उत्तर, 2.5 किमी

**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): आरमोरी,आरमोरी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नांव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): विलास नाजुकराव सेलोटे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती का नाव)

(c) **Date/Year of Birth** (जन्म 1983 (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (अदा केल्याची तारीख):

**Place of Issue** (अदा केल्याची ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कुरंजा,आरमोरी,अरमोरी,गडचिरोली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कुरंजा,आरमोरी,अरमोरी,गडचिरोली,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9423710048

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | यशवंत तुळशिराम धाईत | | | 1. कॅम्प एरीया रामपुरी वार्ड गड,गडचिरोली, गडचिरोली,गडचिरोली,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | रू.500/ दराच्या 9 चलनी नोटा रू.200/ दराच्या 2 चलनी नोटा रू.100/ दराची 1 चलनी नोटा) | 5,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 5,000.00

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

फिर्यादिनांक 12/02/2019मी विलास नाजुकराव सेलोटे, वय 36 वर्षे, जात-कुणबी (ओ.बि.सी), धंदा-विटाभट्टी, रा. मु. कुरंजा, पोस्ट देलोडा, ता. आरमोरी, जि. गडचिरोली. मो.नं. 9423710048. मी दिनांक 11/02/2019 रोजी पोलीस निरीक्षक श्री रवि गोपाळराव राजुलवार, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय गडचिरोली यांचे समक्ष लोकसेवकांविरूद्ध लाच मागणी संबंधाने तक्रार नोंदविली. पोलीस निरीक्षक श्री रवि राजुलवार यांनी माझे सांगण्याप्रमाणे माझी तक्रार संगणकावर टंकलिखीत करून त्यावर माझी सही घेतली. मी नोंदवलेली तक्रार खालीलप्रमाणे आहे. मी मौजा कुरंजा येथील राहणारा असुन मी वडीलोपार्जीत शेतीमध्ये शेतकामाशिवाय विटाभट्टीचा धंदा करतो, आमच्या एकत्र कुटुंबामध्ये माझा चुलत भाऊ नामे जनार्धन राघव सेलोटे, वय 45 वर्षे, याचे नावें विटाभट्टीचा परवाना असुन त्याचे वतीने माझ्या नावे असलेल्या शेतालगत जनार्धन सेलोटे यांची शेती 77 आर. सव्र्हे क्रं. 40/2 अश्या वर्णनाची शेती असुन त्यांच्या शेतीत कुरंजा येथे विटाभट्टीचा व्यवसाय करतो. विटाभट्टीच्या व्यवसायाकरिता तहसिल कार्यालय, आरमोरी येथुन वर्ष 2018-2019 करिता विटाभट्टीचा परवाना नुतनीकरणाकरिता अर्ज केलेला आहे. त्याकरिता परवान्याच्या नियमानुसार दि.18/01/2019 रोजी रितसर रू. 7,870/- चे शासकिय चालान तसेच दि. 24/01/2019 रोजी गडचिरोली जिल्हा मध्यवर्ति सहकारी बंकेत डिस्ट्रिक्ट मिनरल फाउंडेषन यांच्या खाते क्रं. 389801000277 यामध्ये रू.576/- चे आर.टि.जी.एस.द्वारे रक्कम सुद्धा भरलेली आहे. दि.11/02/2019 रोजी मी या वर्षीचा विटाभट्टीचा परवाना तयार झालेला आहे काय? याबाबत विचारणा करण्याकरिता तहसिल कार्यालय आरमोरी येथे जावुन कार्यालयातील बडे बाबु यांना विचारणा केली असता त्यांनी सांगीतले कि, तुमचा परवाना तयार असुन त्यावर तहसिलदार साहेबांची सही होणे बाकी आहे. त्यामुळे मी मा. तहसिलदार श्री यशवंत धाईत साहेबांच्या कक्षात जावुन त्यांना माझे विटाभट्टीच्या परवान्याबाबत विचारणा केली असता तहसिलदार श्री धाईत साहेब मला म्हणाले, तुमच्या विटाभट्टीच्या परवान्यावर सही करण्यासाठी मला रू.5,000/- रुपये दयावे लागेल, तेव्हा मी त्यांना विनंती केली की साहेब, मी गरीब माणुस आहे माझ्याकडे इतके पैसे नाहीत तेव्हा त्यांनी मला रू.5,000/- द्यावेच लागेल नाहीतर तुला विटाभट्टीच्या परवान्यावर सही करून, मंजुर करून देणारच नाही. असे म्हणाले. त्यामुळे मी त्यांना ठिक आहे साहेब. आता माझ्याकडे सध्या पैसे नाहीत असे म्हणालो असता ठिक आहे. नंतर ये. पैसे आणुन दे. त्यानंतरच तुझा परवाना मिळेल. असे म्हणुन त्यांनी मला पैशाची मागणी केली. श्री यषवंत धाईत, तहसिलदार, आरमोरी, ता. आरमोरी जि. गडचिरोली यांनी मला विटाभट्टीच्या परवान्यावर सही करून मंजुर करून देण्याचे कामाकरिता रू.5,000/- लाच रक्कमेची मागणी केली आहे. श्री धाईत, तहसिलदार, आरमोरी, ता. आरमोरी जि. गडचिरोली यांना रु.5,000/- लाच रक्कम देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने मी रु.5,000/- सोबत घेऊन आपले कार्यालयामार्फत कारवाई होणेकरीता स्वेच्छेने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली येथे तक्रार देण्यास आलो. श्री यषवंत धाईत, तहसिलदार, आरमोरी, ता. आरमोरी जि. गडचिरोली यांचेशी माझे कोणतेही वैयक्तीक वैर नसुन

आर्थिक देवाण-घेवाण/उसणवारी अथवा भांडण नाही. म्हणुन मी त्यांचे विरुध्द लाचलुचपत प्रतिबंध अधिनियमानुसार कायदेषिर कारवाई करण्याकरीता स्वेच्छेने तक्रार देत आहे. मी सोबत आणलेले रु.5,000/- हे माझे वैयक्तिक बचतीतील आहेत.त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री रवि राजुलवार यांनी 2 शासकिय पंचांना पाचारण करून त्यांची व माझी एकमेकांना ओळख करून दिली. श्री राजुलवार यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझ्या सहीचा तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. त्यानंतर सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी सुद्धा स्वाक्षरी केली.त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी व्हईस रेकर्डर कश्याप्रकारे काम करतो. याबाबत सविस्तर माहीती दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी पंचासमक्ष लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हईस रेकर्डरद्वारे रेकर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले आणि सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी माझेकडुन सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी लाच रक्कम रू.5000/- (रू.500/- दराच्या 9 चलनी नोटा रू.200/- दराच्या 2 चलनी नोटा रू.100/- दराची 1 चलनी नोटा) घेतल्या. त्यावेळी सदरच्या नोटांचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले. त्यानंतर सदरच्या नोटांना अथ्रसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म व प्रात्यक्षीक करून दाखविले. तदनंतर लाचेच्या रकमेस अथ्रसिन पावडर लावली. मला लाचलुचपत कार्यालयात येण्यास संध्याकाळ झाल्यामुळे तसेच आजरोजी तहसिलदार साहेबांना त्यांचे आरमोरी येथील कार्यालयात भेटणे शक्य नसल्यामुळे उद्या दि. 12/02/2019 रोजी पुढील लाच मागणी पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी मला घरी जाण्यास सांगुन दि.12/02/2019 रोजी सकाळी ला.प्र.वि. कार्यालय गडचिरोली येथे येण्याच्या सुचना दिल्या. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी पंचनामा क्रं. 1 मध्ये घेतल्या आहेत.आज दि. 12/02/2019 रोजी पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन त्याप्रमाणे व्हईस रेकर्डर सुरू करून व्हईस रेकर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हईस रेकर्डर माझे ताब्यात देवुन मला पंच क्रं. 1 यांचेसह तहसिल कार्यालय, आरमोरी, जिल्हा गडचिरोली येथे जाण्यास रवाना केले. तहसिल कार्यालय आरमोरी येथे तहसिलदार श्री यशवंत धाईत साहेबांनी माझेकडे विटाभट्टीचा परवान्यावर सही करून, मंजुर करून देण्याच्या कामाकरिता रू.5000/- लाच रकमेची मागणी करून थोडयाच वेळात लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली. त्यानंतर मी पंच क्रं. 1 सह पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांचेकडे परत गेलो असता पंच क्रं. 1 यांच्या आवाजानंतर व्हईस रेकर्डर बंद करण्यात आला.त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी पंच क्रं. 1 व 2 यांचेसमक्ष व्हईस रेकर्डमध्ये झालेले संभाषणाची टेप ऐकुण लोकसेवक तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी श्री यशवंत धाईत यांनी माझेकडे विटाभट्टीच्या परवान्यावर सही करून, मंजुर करून देण्याच्या कामाकरिता रू.5000/- लाच रकमेची मागणी करून थोडयाच वेळात स्विकारण्याची तयारी दर्षविल्याची खात्री केली. त्यावरून लोकसेवक तहसिलदार श्री यशवंत धाईत यांचेविरूद्ध पुढील सापळा करण्याचे ठरविण्यात आले. त्यावेळी मला अथ्रसिन पावडर लावलेली लाचेची रक्कम देण्यात आली. ती माझे पंटच्या उजव्या खिश्यात ठेवण्यात आली. सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवुन लोकसेवक यांनी स्वतः किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर खांद्यावरील दुपट्टा काढुन 2 वेळा झटकुन चेहरा पुसुन इशारा करण्याबाबत मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणा-यास रंगे हाथ पकडतील असे सांगण्यात आले.त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी व्हईस रेकर्डर सुरू करून व्हईस रेकर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हईस रेकर्डर माझे ताब्यात देवुन मला पंच क्रं. 1 यांचेसह पायीपायी तहसिल कार्यालय, आरमोरी, जिल्हा गडचिरोली येथे जाण्यास रवाना केले. त्याचवेळी सापळा पथकातील काही सदस्य गटा-गटाने माझे मागोमाग आले. त्यानंतर मी व पंच क्रं. 1 तहसिल कार्यालय आरमोरीच्या आत गेलो असता त्याठिकाणी तहसिलदार श्री यशवंत धाईत हे आपल्या कक्षात हजर होते. त्यांचेषी बोलणी दरम्यान त्यांनी रू.5000/- लाचेची रक्कमेची मागणी केली. त्यावरून मी अथ्रसिन पावडर लावलेल्या रू.5000/- रक्कम माझे फुलपंटच्या उजव्या खिश्यातुन काढुन मी तहसिलदार श्री यशवंत धाईत यांना दिल्या असता त्यांनी लाच रक्कम रू.5000/- आपल्या उजव्या हाताने घेवुन मोजुन दैनंदीन टेबलाच्या ड्रूपवर ठेवले. त्यानंतर मी त्यांना माझे काम झाले का? अशी विचारणा केली असता त्यांनी माझेसमक्ष विटाभट्टीच्या परवान्यावर सही केली. त्यानंतर मी पंच क्रं. 1 सोबत दर्शनी ठिकाणी येवुन सापळा पथकास माझे खांद्यावरील दुपट्टा काढुन 2 वेळा झटकुन चेहरा पुसुन लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथकाने तहसिलदार श्री यशवंत धाईत यांना रंगेहात पकडुन पुढील कारवाई केली. सापळा कार्यवाहीबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी पंचनामा क्रं. 2 मध्ये घेतल्या आहेत.तरी लोकसेवक श्री यशवंत धाईत, वय 55 वर्षे, तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी आरमोरी, जिल्हा गडचिरोली यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून माझे विटाभट्टीच्या परवान्यावर सही करून, परवाना मंजुर करून देण्याच्या कामाकरिता रू.5000/- लाच रकमेची मागणी करून तदनंतर माझेकडुन पंचासमक्ष लाचेची रक्कम रू.5000/- स्विकारली. म्हणुन माझी त्यांच्याविरूद्ध लाचलुचपत प्रतिबंध कायद्यानुसार कायदेशीर फिर्याद आहे. माझी वरिल फिर्याद मराठीत संगणकावर टंकलिखीत केली असुन प्रिंट काढल्यानंतर मी वाचुन पाहीली. ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे. समक्ष (रवि राजुलवार) पोलीस निरिक्षकलाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**

(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation: (**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):** **or**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे maharudra baban **Rank (**पद**):** I (Inspector)

**No.(**क्र.**):** 11201000359mbp **to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाम): AJIT T. RATHOD

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): PBMH88983

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**